CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com

सोमवार दि. ५ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ६९ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## अवैध घरगुती गॅस वापराबाबत पंढरपूर तहसील कार्यालयाची कारवाई

✔ **सुराज्य/पंढरपूर :** पंढरपूर शहर हे तीर्थक्षेत्र असल्याने शहर परिसरामध्ये मोठया प्रमाणात गर्दी असते सदर गर्दीमध्ये घरगुती सिलेंडरचा अवैधरीत्या वापर केल्यास मानवी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरची बाब लक्षात घेऊन आज दिनांक ०३ डिसेंबर २०२२ रोजी तहसीलदार सुशील बेल्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात अवैधरीत्या वाहनांमध्ये घरगुती गॅसचा भरणा होत असलेल्या ठिकाणी कार्यवाही करण्यात आली. याबाबत आनंद भानुदास जाधव (वय ३७), रोहित ग्यानबा शिंदे, (वय २० वर्षे) या दोघांविरूदध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कोरवली येथे दुचाकीवरून घसरल्याने शेतकऱ्याच्या मृत्यू

✔ **सुराज्य/सोलापूर :** शेताकडे जाताना दुचाकीवरून घसरून गंभीर जखमी झालेले शंकर किसन फंड (वय ४० रा. कोरवली ता. मोहोळ) हे शेतकरी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी पहाटे मरण पावले. शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास ते कोरवली येथील घरातून शेताकडे निघाले होते. वाटेत दुचाकी घसरल्याने ते जखमी झाले होते. त्यांना कामती येथे प्राथमिक उपचार करून खंडू पवार(भाचा) यांनी सोलापुरात दाखल केले होते. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# राजेंचा हल्लाबोल, दिल्लीत हलकल्लोळ श्रेष्ठींनी बोलावले, कोश्यारींची गच्छंती अटळ?

✔ सुराज्य/मुंबई

**उठसूठ जाहीर कार्यक्रमांमधून वादग्रस्त विधाने करून राज्यात तणावाचे वातावरण निर्माण करणारे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या खुर्चीचे दिवस भरत आलेत, असेच चित्र समोर येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी त्यांनी केलेल्या वादग्रस्त विधानाबद्दल राज्यभर जो वणवा पेटला आहे, तो अजूनही शमत नाहीय. खा. उदयनराजे भोसले यांनी याप्रकरणी दिल्लीला धाडलेल्या पत्राची राष्ट्रपती भवनाकडून गंभीर दखल घेतली गेलीय. कोश्यारी यांना भाजपश्रेष्ठींनी दिल्लीला येण्याची सूचना करण्यात आली असून त्यांची उचलबांगडी होणार की केवळ कानउघाडणी? याविषयी राज्यात उत्सुकता निर्माण झाली आहे.**



कोश्यारी यांच्यावर आजही टीकेची झोड उठवली जात आहे तर त्यांना पदावरून हटवण्यासाठी ठिकठिकाणी आंदोलनेही सुरू आहेत. भाजपचे समर्थक असणारे उदयनराजे भोसले यांनी कोश्यारींच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. छत्रपतींचा अवमान करणाऱ्या राज्यपालांना जे प्रश्न विचारत नाहीत, मूग गिळून गप्प बसतात, ते राज्यपालांएवढेच दोषी आहेत, अशा शब्दात उदयनराजेंनी सत्ताधाऱ्यांना घरचा आहेर दिला आहे. शिवाजी महारांजांचे वंशज व खासदार उदयनराजे यांनी याबद्दल रोष व्यक्त करत राज्यपालांना हटवण्याची मागणी केली. यासाठी त्यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहले होते. आता या पत्राची दखल घेण्यात आल्याचे समजते.

उदयनराजे यांनी शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या राज्यपाल यांना तत्काळ पदावरून हकालपट्टी करावी, अशा मागणीचे पत्र लिहले होते. आता राज्यपाल यांची केंद्रीय गृहविभाग चौकशी करणार असल्याची माहिती, स्वत: उदयनराजे यांनी दिली आहे. राज्यपालांच्या वादग्रस्त विधानाची दखल खुद्द भाजपपक्ष श्रेष्ठींनी देखील घेतली आहे. पश्रश्रेष्ठींनी त्यांना २४ व २५ तारखेला दिल्ली येथे बोलवले आहे. कोश्यारी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा गृहमंत्री अमित शहा यांना भेटणार याबाबतची माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे. पक्षश्रेष्ठीं कोश्यारींना पदावरुन हटविणार का कानउघडणी करणार, याकडे सगळ्याचे लक्ष लागले आहे.

### दुर्बुध्दी का सुचावी

कोश्यारी यांनी यापूर्वी अनेक वादग्रस्त विधाने केली आहेत. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर राजभवनाच्या पडद्याआड कोश्यारी यांनी राजकीय धुमाकूळ कसा घातला हे राज्याने पाहिले आहे. आघाडीने आमदार नियुक्तीसाठी पाठवलेली यादी रोखून धरली. अनेक विधेयके अडवून ठेवली. राज्यपालपदावर बसणारी व्यक्ती निपक्ष असली पाहिजे, असे घटना सांगते. तरीही कोश्यारी यांनी सातत्याने गुण उधळून राजकारण करण्याचा प्रयत्न केला. त्यांना यापूर्वी दिल्लीश्वरांनी जपून बोलण्याचा सल्ला दिला होता. तरीही औरंगाबादच्या कार्यक्रमात त्यांना दुर्बुध्दी सुचलीच. आता मात्र श्रेष्ठींना त्यांचे पंख छाटावेच लागतील.

### कोश्यारी काय म्हणाले होते...

औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदवीदान समारंभ नुकताच झाला. यावेळी भगतसिंग कोश्यारींच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि भाजपचे नेते नितीन गडकरी डीलिट ही पदवी देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमात कोश्यारी म्हणाले, आम्ही जेव्हा शाळेत शिकत होतो, तेव्हा आमचे शिक्षक आम्हाला विचारत असत की- तुमचा आवडता नेता कोण? कुणी सुभाषचंद्र बोस, कुणी महात्मा गांधी, कुणी पंडित नेहरूंचे नाव घ्यायचे. मला वाटते आता हा प्रश्न आला की तुमचा आयकॉन कोण? तुमचा आवडता नेता कोण? तर तुम्हाला बाहेर जायची आवश्यकता नाही. महाराष्ट्रातच तुम्हाला तुमचे आयकॉन मिळतील. छत्रपती शिवाजी महाराज तर जुन्या युगातले झाले. मी आत्ताच्या काळात बोलत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून ते नितीन गडकरींपर्यंत अनेक आयकॉन आहेत.




## अखेर त्या जुळ्या वधूसह वरांवर गुन्हा दाखल

✔ **सुराज्य/अकलूज :** माळेवाडी अकलूज येथे एकाच वेळी दोन वधूशी लग्न केल्याप्रकरणी वराविरुध्द अकलूज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून अकलूज पोलिसांनी १९६० च्या कलम ४९४ नुसार व्दिभार्या प्रतिबंधक कायदे अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अकलूज पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार माळेवाडी अकलूज येथील हॉटेल गलांडे येथे शुक्रवार दि २ डिसेंबर रोजी दुपारी १२:३० वा. गट नं २ ता. माळशिरस येथील अतुल आवताडे याने डोंबिवली मुंबई येथील रिंकी व पिंकी वय ३६ या जुळया बहिणींशी एकाच वेळी विवाह करून व्दिभार्या प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन केले म्हणून माळेवाडी अकलूज येथीलच राहुल फुले या युवकाने अकलूज पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असता अकलूज पोलिसांनी अतुल आवताडे यांच्या विरुध्द अदखलपात्र (एन. सी) क्र. १७ ७२ / २२ ने गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस निरीक्षक अरुण सुगावकर हे करीत आहेत.

## कुर्डूवाडीत अडीच लाखांच्या बनावट नोटा जप्त

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी शहरात पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर अडीच लाखांच्या ५०० रुपयांच्या बनावट नोटा घेऊन जाणाऱ्यास ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी मोठ्या शिताफीने वेषांतर करुन पकडले. ही कारवाई शनिवारी दि. ३ रोजी दु. ४. १५ वा. सुमारास कुर्डूवाडी येथील टेंभुर्णी चौकात केली.



हर्षल शिवाजी लोकरे (वय २० रा. कंदर ता. माढा) व सुभाष दिगंबर काळे (वय ३६ रा. भोसरे ता. माढा) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत पथक प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे यांनी दिलेली माहिती अशी की- ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार कुर्डूवाडी परिसरात एक व्यक्ती बनावट नोटा घेऊन बाजारात खपवण्यासाठी निघाला असल्याची माहिती मिळाली होती. या मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पोलिसांनी चित्रपटाप्रमाणे वेगवेगळ्या वेषभूषेत वेशांतर करून अगदी हार विक्रेत्याप्रमाणे हार विकत टेंभुर्णी चौकात पाळत ठेवली होती.

त्यावेळी त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीप्रमाणे एक तरुण मोटारसायकलवरुन बॅगेत नोटा घेऊन जात असल्याचे समजले. पोलिसांनी तात्काळ त्याला गराडा घालून पकडले व त्याची तपासणी केली असता मिळालेल्या माहितीप्रमाणे त्याच्याकडे ५०० रुपयांच्या हुबेहूब सुमारे अडीच लाख रुपयांच्या नोटा मिळून आल्या. त्यावरील म. गांधीजींचा फोटा, वॉटरमार्क देखील होता पण त्याचा कागद हा हलक्या प्रतीचा मिळून आला तसेच एकाच नंबरच्या दोन नोटा आढळून आल्या. सदर व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने या नोटा भोसरे ता. माढा येथील सुभाष दिगंबर काळे याने दिल्या असल्याचे सांगितले. पोलिसांनी लगेच काळे याला कुर्डूवाडीपासून टेंभुर्णीच्या दिशेन १५ कि. मी अंतरावर जाऊन पकडले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, निरीक्षक स्थान. गुन्हे शाखा सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व उप निरीक्षक राजेश गायकवाड, सहाय्यक पोलीस उप. निरीक्षक नीलकंठ जाधवर, श्रीकांत गायकवाड, बिराजी पारेकर, हवालदार सर्जेराव बोबडे, आबासाहेब मुंढे, विजय भरले, सलीम बागवान, हरिदास पांढरे, रवी माने, पो. कॉ. विनायक घोरपडे, चालक पो. कॉ. दिलीप थोरात यांच्या पथकाने केली.

## रस्ता ओलांडताना कंटेनरची धडक; एकाचा जागीच मृत्यू

✔ **सुराज्य/मोहोळ :** रस्ता ओलांडताना कंटेनरची धडक लागून एकाचा जागीच मृत्यू झाला ही घटना रविवारी चार वाजणेच्या सुमारास मोहोळ जवळ कन्या प्रशाला चौकात घडली.

मुंबई कडून सोलापूर कडे निघालेला कंटेनर (क्र. एम. एच. ४६ बीयू. ४६०५) हा सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या दरम्यान येथील कन्या प्रशाला चौकात आला असता कन्या प्रशाला चौकातून मोहोळ शहराकडे एक अनोळखी ४५ वर्षीय इसम रस्ता ओलांडत असताना कंटेनरने त्याला जोराची धडक दिल्याने तो कंटेनरच्या मागील चाकाखाली येऊन जागीच ठार झाला. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात कंटेनर चालक संभाजी विलास कोळेकर राहणार आरेवाडी तालुका कवठेमहांकाळ याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात मृत इसमाच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे.



## कर्नाटकाचा झेंडा फडकावल्याने उडगीत १७ जणांवर गुन्हा दाखल

✔ **सुराज्य/अक्कलकोट :** उडगी (ता. अक्कलकोट) येथे सीमावाद प्रश्नावर कर्नाटक राज्याचे झेंडा फडकावणे, जयघोष करणे. एकंदरीत वातावरण बिघडवल्याप्रकरणी तब्बल १७ जणावर दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलिसांनी कारवाई केली आहे. यामुळे आंदोलन कर्त्यामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

उडगी येथे दि. २ डिसेंबर रोजी उमेश कोळी, रमेश भांड, अप्पाशा कुंभार, सिध्दाराम पुजारी, शरणू कोळी, श्रीकांत कोळी, कलप्पा मामा, सुरेश माड्याळ, धुळप्पा जिगजांबगी, सोमु आलूरे, विशाल पॅटी, सुरेश हडपद, शरणप्पा कुंभार, देवेंद्र नारायणकर, सुभाष भांड, अनविरप्पा स्वामी, नागणा म्हेत्रे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. सदरची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ राजेंद्रसिह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदीप काळे, त्यांचे पोलीस कर्मचारी यांनी केली आहे. तडवळ भागातील वातावरण शांत होत नाही, तोपर्यंत उडगी येथे शेकडो लोकांना एकत्रित करून जयघोष करणारे कोण, यांना भडकवणारे कोण आहेत. याचा पोलिसांनी शोध घेणे आवश्यक आहे.

## विठ्ठल कारखान्यात अपघात; एक कामगार ठार

✔ सुराज्य/पंढरपूर

तालुक्यातील गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यामधील बॉयलिंग हाउसमध्ये काम करत असताना प्रेशर वॉल फेल होऊन तुटले व त्याचा दणका बसल्याने एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून एकजण गंभीर जखमी झाला आहे. जखमी कामगाराच्या उपचाराचा खर्च कारखाना करत आहे. कामगारांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. मयत कामगाराच्या कुटुंबीयांना विम्याचा लाभ आणि मदत म्हणून त्यांच्या दोन्ही मुलांच्या नावे ६ लाख रुपयांची एफडी करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांनी दिली. रविवारी सकाळी हा अपघात घडला. यामध्ये सुधाकर सदाशिव चौगुले यांचा मृत्यू झाला तर सोमनाथ मारुती नरसाळे यांच्यावर सोलापूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत समजलेली अधिक माहिती अशी की, मागील वर्षी बंद असलेला पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे यंदा गाळप सुरू आहे. सकाळी कारखान्याच्या बॉयलिंग हाउसमध्ये सुधाकर सदाशिव चौगुले (रा. सांगवी ता. पंढरपूर) व सोमनाथ मारुती नरसाळे (रा. जळोली ता. पंढरपूर) हे उत्पादन विभागाचे दोन कर्मचारी स्टीम वॉलचे काम करत होते. मात्र यावेळी यंत्रणेत बिघाड होऊन स्टीम हॉल निकामी झाला तसेच त्याचा दणका दोन्ही कामगारांना बसला.


### कामगाराच्या दोन मुलांच्या नावे ३-३ लाखांची एफडी

विठ्ठल सहकारी साखर कारखान्यामध्ये झालेल्या अपघातामध्ये सुधाकर चौगुले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आम्ही त्यांच्या कुटुंबाच्या दुःखामध्ये सहभागी आहोत. मयत चौगुले यांच्या मुलाच्या आणि मुलीच्या नावे तीन-तीन लाख रुपयाच्या एफडी मदत म्हणून आम्ही करणार आहोत. तसेच विठ्ठल कारखान्याच्या वतीने कामगारांचा इन्शुरन्स काढण्यात येतो. कागदपत्राची पूर्तता करून त्यांना जवळपास ३५ ते ४० लाख रुपयांचे इन्शुरन्स मिळवण्यासाठी कारखाना कटिबध्द आहे. कारखान्याचे कामगार माझे कुटुंब आहे. मी कामगारांसोबत आहे.

– **अभिजित पाटील,** चेअरमन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**कन्फ्युजन ही कन्फ्युजन है, सोल्युशन का पता नही !!!**

## एकादशीनिमित्त पंढरीत दीड लाखाहून अधिक भाविक

✔ सुराज्य/पंढरपूर

मार्गशीर्ष महिन्यातील भागवत एकादशीस पंढरीत दीड लाखाहून अधिक भाविकांनी हजेरी लावली होती. यामुळे श्री विठ्ठल व रूक्मिणीची पदस्पर्श रांग पत्राशेडच्याही पुढे गेली होती.

वारकरी संप्रदायात मार्गशीर्ष महिन्याला मोठे महत्व आहे. याच महिन्याच्या एकादशीला भगवान श्रीकृष्णाने कुरूक्षेत्रावर अर्जुनाला गीता सांगितली होती. यामुळे एकादशी व गीता जयंती असा दुहेरी योग असतो. तसेच या महिन्यात श्री विठुराया पंढरीपासून दोन किमी. अंतरावर असणाऱ्या चंद्रभागेच्या काठावरील विष्णुपद येथे मुक्कामी असतात अशी मान्यता आहे. यामुळेच मार्गशीर्ष महिन्यातील शुध्द एकादशीस दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक विठुरायाच्या व विष्णुपदाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. यंदा शनिवार व रविवार अशा दोन एकादशी आल्या होत्या. यापैकी शनिवारी गीता जयंती होती तर रविवारी भागवत एकादशी होती. यामुळे शुक्रवारी २ पासूनच भाविकांनी पंढरीत गर्दी केली होती. रविवारी सकाळ पासून या गर्दीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. एकादशीला दर्शन घेण्यासाठी शनिवारी रात्री पासूनच भाविकांनी दर्शन रांगेत मुक्काम ठोकला होता. गोपाळपूर नजिक असणाऱ्या पत्राशेडच्या पुढे ही रांग गेली होती. तर दिवसभर चंद्रभागेचे वाळवंट, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग येथे भाविकांची मोठी गर्दी होती. अनेक भाविकांनी चंद्रभागा नदीमधून नावेमधून जात विष्णुपद येथे दर्शन घेतले. या ठिकाणी देखील दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. सुरक्षेसाठी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने विष्णुपद मंदिराला व नदीवरून येणाऱ्या दगडी पुलाला लाकडी बॅरेगेटींग केले आहे. दरम्यान दर महिन्याच्या एकादशीला भाविकांची मोठी गर्दी होते याचा अनुभव असून देखील पदस्पर्श रांगेत पोलीस बंदोबस्त ठेवला जात नाही. पदस्पर्श दर्शन बंद झाल्यावर देखील मोठ्या संख्येने भाविक रात्रभर रांगेतच उभा असतात परंतु या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येत नाही. तसेच महाव्दार चौक, चौफाळा येथे वाहनांची व भाविकांची एकच गर्दी झाल्याने वाहतूक कोंडी होते. मात्र याबाबत वाहतुकीचे कोणतेही नियोजन केले जात नसल्याचा अनुभव कायम आहे.



CMYK